MHSN050036392022

दाखल दिनांक :– ०४.१०.२०२२
नोंदणी दिनांक :– ०४.१०.२०२२
निकाल दिनांक :– ११.०२.२०२६
**कालावधी :– ०३ व., ०४ म., ०७ दि.**

## इस्लामपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायलय क्र.४) यांच्या न्यायालयात

( पिठासिन अधिकारी – श्री. व्ही. ए. जाधव )

| | |
|---|---|
| **नियमित फौजदारी खटला क्र.५६/२०२६ (सं.फौ.ख.क्र. १२०३/२०२२)** | **निशाणी क्र.३८** |
| **गु.र.नं.– १६३/२०२२** | **पोलीस ठाणे कुरळप** |
| **सरकार पक्ष.** | **महाराष्ट्र शासन.** तर्फे पोलिस स्थानक अधिकारी, आष्टा पोलीस ठाणे. |
| **सरकार पक्ष** | **श्रीमती एस आर पाटील. (सहा. सरकारी वकील.)** |
| **आरोपी** | **अतुल शामराव शेजावळे,** वय :– २५, व्यवसाय :– शेती, रा. गोटखिंडी, ता.वाळवा, जि. सांगली. |
| **आरोपीतर्फे वकील.** | **श्री.ए.जे.पाटील** |

### भाग – ब

| | | |
|---|---|---|
| १. | प्रथम खबर दिनांक | ०९.०८.२०२२ |
| २. | दोषारोप पत्राचा दिनांक | ०४.१०.२०२२ |
| ३. | दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २६.०७.२०२३ |
| ४. | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०८.०२.२०२४ |
| ५. | न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | युक्तीवादानंतर त्वरीत घोषीत करण्यात आला. |
| ६. | न्यायनिर्णयाचा दिनांक | ११.०२.२०२६ |
| ७. | शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपींचा तपशील

| श्रेणी | आरोपींचे नाव | आरोपीची अटक तारीख | आरोपी जामीन दिल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अतुल शामराव शेजावळे | फौ.प्र.सं. कलम ४१ (अ) १ अन्वये नोटीस | --- | भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४(अ), ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम कलम १८४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

## भाग –क

## सरकारपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. सरकार

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र.१ | अतुल तानाजी कांबळे | फिर्यादी (नि.क्र.१८) |
| स.सा.क्र.२ | दिपक प्रभाकर हांडे | साक्षीदार (नि.क्र.२२) |
| स.सा.क्र.३ | मारुती लक्ष्मण कांबळे | घटनास्थळ पंच (नि.क्र.२४) |
| स.सा.क्र.४ | प्रमोद राजाराम बनसोडे | घटनास्थळ पंच (नि.क्र.२६) |
| स.सा.क्र.५ | विजय हिंदुराव बनसोडे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार (नि.क्र.२८) |

| | | |
|---|---|---|
| स.सा.क्र.६ | बाजीराव शांताराम भोसले | तपासी अधिकारी (नि.क्र.२९) |
| स.सा.क्र.७ | सुनिल त्रींबक कुलकर्णी | तपासी अधिकारी (नि.क्र.३२) |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| **ब.सा.क्र.१.** | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| **सी.सा.क्र.१** | निरंक | निरंक |

## सरकारपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी

**अ. सरकार**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| **१.** | निरंक | निरंक |

**ब. बचाव**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| **१** | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| **१.** | १९ | फिर्याद |
| **२.** | २५ | घटनास्थळ पंचनामा |
| **३.** | ३० | तपासाचा आदेश |

ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## –: न्या य नि र्ण य :–
## (दिनांक ११.०२.२०२६ रोजी)

प्रस्तुतचे प्रकरण हे आरोपीच्या विरोधात भारतीय दंड विधान संहितेचे कलम २७९, ३०४(अ), ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये चालविण्यात आले.

### सरकार पक्षाचे थोडक्यात कथन.

२. दिनांक ०९.०८.२०२२ रोजी दुपारी १.३० वाजता फिर्यादी अतुल (स.सा.क्र.१) मौजे येडेनिपाणी येथील त्यांचे घरी असताना त्यांचे गल्लीतील अनुज सुनिल बनसोडे हे फिर्यादीच्या घरी येवून फिर्यादीस सांगितले की, 'तुमचे शेजारी राहणारे तुमचे नातेवाईक प्रभाकर साधु हांडे हे येडेनिपाणी ते गोठखिंडी रोडने त्यांचे शेतामध्ये पायी चालत जात असताना ते माळी स्मशान भुमी येथे पाहचले असता, एक इसम त्याचे ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगाने चालवत येवून प्रभाकर साधू हांडे यांना पाठीमागून जोराची धडक देवून त्यांना गंभीर जखमी केले आहे'. फिर्यादी व अनुज बनसोडे व शेजारी लोक असे सर्वज्ण अपघाताचे ठिकाणी जावून पाहिले असता, प्रभाकर साधू हांडे यांना अपघातामध्ये डोक्याला मार लागून नाकातून व तोंडातून रक्त येवून बेशुध्द अवस्थेत रस्त्यावर पडले होते. प्रभाकर हांडे यांना धडक दिलेला इसम तेथेच थांबला होता. त्या इसमाने त्याचे नाव अतुल शामराव शेजावळै असे सांगितले व धडक दिलेल्या मोटारसायकलचा क्र.एम.एच.१४–सी.ई–३६५० तेथे उभी होती. त्यानंतर फिर्यादी यांनी रुग्णवाहिकेस फोन करुन बोलावून घेतले. डॉक्टरांनी प्रभाकर हांडे यांना तपासून ते मयत असलेबाबत सांगितले. घटनास्थळी पोलीस आलेनंतर फिर्यादी व त्यांचे नातेवाईक प्रभाकर हांडे यांचा मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद कुरळप येथे शवविच्छेदनाकरीता घेवून गेले. सदर अपघाबाबत फिर्यादीने आरोपीच्या विरोधात प्रमाणे

कुरळप पोलीस ठाण्यात फिर्याद (निशाणी १९) नोंदवली.

## तपास व दोषारोपपत्र.

३. सदरच्या तक्रारी वरून प्रथम खबर क्र.१६३/२०२२ नोंदवण्यात येऊन सदर गुन्ह्याचे कामी घटनास्थळ पंचनामा सहा.पोलीस उप निरीक्षक सुनिल त्रींबक कुलकर्णी (स.सा.क्र.७) यांनी केला. त्यानंतर सदर गुन्ह्याचा तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल बी.एस.भोसले (स.सा.क्र.६) यांच्याकडे सोपवण्यात आला होता. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवुन जखमीचे वैद्यकीय कागदपत्रे हस्तगत केली. तपासाअंती त्यांना आरोपीविरूद्ध पुरेसा पुरावा मिळुन आल्याने त्यांच्या विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

## दोषारोप, निवेदन व आरोपींचा बचाव.

४. प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३०४-अ अन्वये गुन्हा तोहमत केला आहे. प्रस्तुत खटल्यामध्ये माझ्या पुर्व पिठासीन अधिकारी यांनी त्याच्यावरती नि.क्र.१० प्रमाणे दोषारोप ठेवला त्यामुळे सदचा खटला हा नियमित फौजदारी खटला नोंदविण्यात आला. आरोपी न्यायालयात हजर झाला. आरोपीने नि.क्र.११ वरील निवेदना नुसार त्याच्यावरील दोषारोप मान्य व कबुल केला नाही आणि संपरिक्षेची मागणी केली.

५. फिर्यादीने सदर खटल्याच्या पुराव्याचेकामी प्रस्तुत प्रकरणात एकुण ७ साक्षीदार तपासले तसेच अभियोग पक्षाच्या तोंडी विनंतीवरुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करणेत आला. सरकार पक्षाच्या पुराव्याअंती आरोपी विरूद्ध त्यांना गुन्ह्यात गुंतवणारा पुरावा आलेला असलेमुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब निशाणी ३३ येथे नोंदविण्यात आला.

## विचाराधीन मुद्दे व त्यांचे निष्कर्ष.

६. सरकार पक्षातर्फे विधिज्ञ श्रीमती एस. आर. पाटील व आरोपीचे विधिज्ञ श्री.ए.जे.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध पुराव्यावरून व दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांच्या युक्तिवादावरून खालिल मुद्दे चर्चेसाठी उपस्थित होतात त्याचे निष्कर्ष कारणांसह मी नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्षाने दि. ०९.०८.२०२२ रोजी दुपारी १.३० वाजता मौजे येडेनिपाणी गावचे हद्दीत येडेनिपाणी ते गोठखिंडी जाणारे रोडवर, माळी स्मशानभुमी जवळ, ता.वाळवा, जि.सांगली येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एम.एच.१४–सी.ई.–३६५० हे वाहन बेदारकारपणे व निष्काळजीपणे चालवुन भारतीय दंड संहितेचे कलम २७९ प्रमाणे अपराध केल्याचे सिध्द केले काय ? | . . . **नाही.** |
| २. | सरकारपक्षाने वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त् वाहन निष्काळजीपणे व बेदारकारपणे चालवुन प्रभाकर हांडे याच्या मृत्युस कारणीभुत ठरुन भारतीय दंड संहितेचे कलम ३०४ (अ) प्रमाणे अपराध केल्याचे सिध्द केले काय ? | . . . **नाही.** |
| ३. | सरकार पक्षाने वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व बेदारकारपणे चालवुन मयत प्रभाकर हांडे यांना गंभीर दुखापत करुन भारतीय दंड संहितेचे कलम ३३८ प्रमाणे अपराध केल्याचे सिध्द केले काय ? | . . . **नाही.** |
| ४. | सरकार पक्षाने वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन रस्त्याच्या विशीष्ट परिस्थीतीकडे दर्लक्ष करुन धोकादायकरित्या चालवुन मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे अपराध केल्याचे सिध्द केले काय ? | . . . **नाही.** |
| ५. | अंतीम आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## – का र णे मि मां सा –

७. सरकार पक्षातर्फे आरोपी विरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी एकुण ७ साक्षीदारांचा जबाब नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी (सा.क्र.१, नि.क्र.१८), दिपक प्रभाकर हांडे (सा.क्र.२, नि.क्र.२२), घटनास्थळ पंच मारुती कांबळे (सा.क्र.३, नि.क्र.२४) व

घटनास्थळ पंच प्रमोद बनसोडे (सा.क्र.४, नि.क्र.२६), प्रत्यक्षदर्शी साक्षीदार विजय हिंदुराव बनसोडे (सा.क्र.५, नि.क्र.२८), तपासी अधिकारी बाजीराव शांताराम भोसले (सा.क्र.६, नि.क्र.२९), साक्षीदार सुनिल त्रींबक कुलकर्णी (सा.क्र.७, नि.क्र.३२) या व्यतिरीक्त सरकारपक्ष हा फिर्याद (नि.क्र.१९), घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२५), मयताचा मरणोत्तर पंचनामा (नि.क्र.२७), अंतरिम शवविच्छेदनसाठी पाठवायचा पोलिस अहवाल (नि.क्र.२८) आणि वाहन सुपुर्तनामा (नि.क्र.२९) या कागदोपत्री पुराव्यावरती विसंबुन आहे.

## वकीलांचा युक्तीवाद

८. सरकार पक्षातर्फे सरकारी वकीलांनी आरोपी वरील आरोप हे साक्षीदारांच्या साक्षीमधुन संशयापलीकडे सिध्द होत असल्यामुळे त्यास कडक शासन करावे अशी विनंती केली आहे. तर आरोपीचे वकील श्री.ए.जे.पाटील यांनी सरकार पक्षाने घटनेच्या दिवशी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालवुन प्रभाकर हांडे याच्या मृत्युस कारणीभुत झाल्याबाबतचे संशया पलिकडे सिध्द केलेले नसल्यामुळे, साक्षीदारांच्या विसंगतीमधून निर्माण होणाऱ्या संशयाचा फायदा आरोपीस देऊन त्याची निर्दोष मुक्तता करण्याची विनंती केली आहे.

## मुद्दे क्र.१ ते ४ साठी.

९. मुद्दे क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संल्लग्न असल्यामुळे ते एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतले आहेत. आरोपी विरोधात निश्चित करण्यात आलेल्या आरोपाच्या अनुषंगाने सरकार पक्षाने घटनेच्या दिवशी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन सार्वजनीक रस्त्यावरती हयगाईने व निष्काळजीपणे चालवुन प्रभाकर हांडे याच्या मृत्यूस कारणीभुत झाल्याचे संशयाच्या पलीकडे सिध्द करणे जरूरीचे आहे. तपासाचा आदेश (नि.क्र.३०) या लेखी पुराव्या वरती विसंबुन आहे.

१०. आरोपी विरोधात निश्चीत करण्यात आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने सरकार

पक्षाने घटनेच्या दिवशी आरोपीने त्याच्या ताब्यातील ओमीनी गाडी वाहतुक नियमांचे उल्लंघन करुन हयगयीने बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालवुन मयत प्रभाकर हांडे यांना गंभीर दुखापत होवून त्यांच्या मृत्युस कारणीभुत झाल्याचे संशयाच्या पलीकडे सिध्द करने जरूरीचे आहे. त्या अनुषंगाने फिर्यादीचा न्यायालया समोरील पुरावा विचारात घेणे आवश्यक आहे.

**११.** सदर खटल्यामध्ये फिर्यादी (स.सा.क्र.१) हा मुख्य साक्षीदार आहे. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, मयत प्रभाकर हांडे हे त्याच्या शेजारी राहतात, त्यांचा अपघात होवून ते मयत झाले आहेत. घटनेदिवशी ते घरी जेवत असताना, शेजारी असलेले अनुज बनसोडे त्यांचे घरी आले व त्यांनी नातेवाईकाचा अपघात झाल्याचे सांगितले. त्यामुळे फिर्यादी घटनास्थळी गेले. तेथे प्रभाकर हांडे रस्त्यावर पडलेले होते. त्यांना गाडीची धडक बसली होती. ज्या गाडीने धडक दिली त्या गाडीचा क्र.एम.एच.१४–३५६० असा होता. ती दुचाकी कोणाची होती हे फिर्यादीने त्यास माहित नसल्याचे कथन केले आहे. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात पुढे असे कथन केले की, घटनास्थळी भरपूर लोक जमा झाले होते, गाडी कोणाची होती याबाबत त्याने चौकशी केली नाही. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात पुढे असे कथन केले की, त्याने आरोपी विरुध्द निशाणी १९ वरील फिर्याद दाखल केली. फिर्याद (निशाणी १९) चे अवलोकन केले असता, त्यामध्ये असे नमुद आहे आरोपी धडक दिलेनंतर तेथेच थांबला होता व त्याने आरोपीस त्याचे नाव विचारले असता आरोपीने त्याचे नाव अतुल शेजावळे असे सांगितले. तसेच फिर्यादी निशाणी १९ वरील फिर्याद देतेवेळी अपघाताचेवेळी आरोपी त्याचे वाहन भरधाव वेगाने चालवित होता असे ही बाब फिर्यादमध्ये नमुद आहे. सरकारपक्षाची अशी हकीकत आहे की, घटनेवेळी आरोपी त्याचे वाहन भरधाव वेगाने चालवित होता. परंतू फिर्यादीने त्याच्या पुराव्यात फिर्यादीमध्ये नमुद असणाऱ्या सदर मुख्य घटना कथन केलेल्या नाहीत. फिर्यादीने त्याच्या उलटतपसात त्याला आरोपीचे नाव पोलीसांकडून नंतर माहिती झाले व त्यानंतर पोलीसांचे सांगणेवरुन फिर्यादीमध्ये आरोपीचे नाव कथन केले याबाबी मान्य केल्या. तसेच फिर्यादीने त्याच्या पुराव्यात आरोपीच्या गाडीचा अचुक क्रमांक देखील कथन केलेला नाही. त्यामुळे फिर्यादीने दिलेला पुरावा हा फिर्यादी मधील कथनांशी

सुसंगत नाही.

१२. विजय (सा.क्र.५) हा खटल्यातील एकमेव प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. सरकार पक्षाची पुर्ण भिस्त सदर साक्षीदारावर अवलंबून आहे. विजय (सा.क्र.५) याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, दुपारी १.३० च्या सुमारास माळी स्मशानभुमी येथे येडेनिपाणी गोटखिंड रोडवर तो शेतातून येत असताना त्याच्या समोर प्रभाकर हांडे यांना पाठीमागून गाडी धडकली. त्यानंतर त्यांनी गाडी चालकाचे नाव विचारले असता त्याने त्याचे अतुल शेजावळे असे सांगितले. सदर गाडी युनिकॉर्न कंपनीची होती व तिचा क्र.एम.एच.१४ सी.ई.३६५० असा होता. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पुढे असे कथन केले की, सदर अपघातामध्ये प्रभाकर हांडे हे खाली पडले, त्यांच्या डोक्याला दुखापत झाली व सदर अपघातात ते मयत झाले. सदर साक्षीदाराने सरकार पक्षाला पुरक साक्ष दिली असली तरी देखील अपघाताचेवेळी मोटारसायकल चालक त्याचे वाहन वेगात चालवित होता ही मुख्य बाब कथन केली नाही. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात येडेनिपाणी ते गोटखिंड रोडवर शेकडो गाड्या धावतात व सदरचा रस्ता हा सांगली पर्यंत डांबरी रोड व राज्य महामार्ग आहे ही बाब मान्य केली. मुळातच सरकार पक्षाची अशी हकीकत आहे की, अपघाताचे वेळी आरोपी त्याचे वाहन वेगात चालवित होता परंतू सदरील मुख्य बाब सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात कथन केलेली नाही. विजय (स.सा.क्र.५) याने त्याच्या पुराव्यात प्रभाकर हांडे हे सदर रस्त्यावर कोणत्या दिशेने कोणत्या दिशेकडे जात होते, मोटारसायकलचालक कोणत्या बाजुने कोणत्या बाजुकडे निघाला होता, प्रभाकर हांडे अपघातावेळी सदर रस्त्याच्या कोणत्या ठिकाणी होते, व मोटारसायकल चालकाची हयगयीची व निष्काळजीपणाची नेमकी कोणती कृती होती ज्यामुळै अपघात झाला याबाबी त्याच्या पुराव्यात नाहीत. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही केवळ सदर सदर अपघाताच्या अनुषंगाने घटनास्थळावरील त्याच्या उपस्थितीपुरतीच मर्यादीत आहे. परंतू आरोपी त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवित होता हे सिध्द करणेकरीता पुरेशी नाही.

१३. सदर घटनेच्या अनुषंगाने धडक दिलेले नेमके ठिकाण व घटनास्थळावरची परिस्थिती देखील सिध्द होणे गरजेचे व आवश्यक आहे. प्रस्तुत खटल्यामध्ये सरकार पक्षाने घटनास्थळ पंच मारुती (सा.क्र.३) व अन्य घटनास्थळ पंच प्रमोद (सा.क्र.४) यांची साक्ष नोंदविली. मारुती (सा.क्र.३) याने त्याच्या पुराव्यात दिनांक ०९.०८.२०२२ रोजी पोलीसांनी त्यास पंच म्हणून येडेनिपाणी गावात बोलविले होते. त्याने त्याच्या पुराव्यात घटनास्थळ हे गावात नागोबाच्या ओढ्याजवळ होते व घटनास्थळाच्या पुर्वेस येडेनिपाणी गोडखिंड, दक्षिणेस ओढा व उत्तरेस गाव आहे असे कथन केले. सदर साक्षीदाराने पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा निशाणी २५ नुसार केला असे कथन केले असले तरी त्याचे विस्तृत तपशील कथन केला नाही. सदरील साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात तो शेतात जात असताना अपघात झाल्याचे दिसल्याने उत्सुकता म्हणून त्या ठिकाणी गेला होता व त्यानंतर त्याचे शेजारील व्यक्ती मयत झाल्याने त्यांना मदत करण्यासाठी त्याने पंचनाम्यावर सही केली याबाबी मान्य केल्या. सदरील मान्य केलेल्या बाबींच्या आधारे सदरील पंच साक्षीदाराची साक्ष ही न्यायालयास विश्वासार्ह वाटत नाही. तसेच सदरील साक्षीदाराने त्याच्या सरतपासात घटनास्थळी शेजावळे नावाची व्यक्ती दुचाकी गाडी उभी करुन होती ही बाब कथन केली असली तरी देखील तो ज्यावेळी घटनास्थळावर गेला होता त्यावेळेस पोलीसांनी वाहतुकीस अडथळा होवू नये म्हणून वाहने बाजुला उभी केली होती ही बाब देखील मान्य केली आहे. सदरील साक्षीदाराने त्याच्या सरतपासात व उलटतपासात कथन केलेल्या बाबी या एकमेकांना विसंगत आहेत. सदर पंच साक्षीदाराच्या एकंदर साक्ष पुराव्याचे अवलोकन केले असता त्याची साक्ष घटनास्थळ पंचनामा (नि.२५) सिध्द करणेस पुरेशी नाही.

१४. अन्य घटनास्थळ पंच प्रमोद (सा.क्र.४) याने त्याच्या पुराव्यात दिनांक ०९.०८.२०२२ रोजी पोलीसांनी त्याला पंच म्हणून शिराळा ते गोटखिंडी या रोडवर नागोबाचा ओढा या ठिकाणी अपघाताचा पंचनामा करणेसाठी बोलविले होते. अपघाताचे ठिकाण ओढ्यापासून २५ फुट अंतरावर होते. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पुर्वेस व पश्चिमेस रस्ता, उत्तरेस शेत व स्मशानभुमी व दक्षिणेला राजाराम महादेव पाटील यांची शेती आहे असे

कथन केले आहे. सदर ठिकाणी हिरो होंडा गाडीने प्रभाकर हांडे यांना उडविले होते असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पोलीसांनी सदर ठिकाणी निशाणी २५ वरील घटनास्थळ पंचनामा केला व त्याने त्यावर वाचून सही केली असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात, प्रभाकर हांडे यांचेशी घरगुती संबंध असून ते पै पाहुणे आहेत व तो साक्षीच्या दिवशी न्यायालयात प्रभाकर हांडे यांचे सोबत आला आहे ही बाब मान्य केली आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात घटनास्थळावर बरेच लोक जमा झाले ही बाब देखील मान्य केली आहे. पंचनाम्याकरीता असणारे पंच साक्षीदार हे स्थानिक व स्वतंत्र असावेत असे अपेक्षीत आहे. अशा परिस्थितीत मयताचे नातेवाईकांशी घरगुती संबंध असणाऱ्या व्यक्तीला पंच साक्षीदार म्हणून घेणे योग्य नाही. त्यामुळे त्याच्या पुराव्याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच प्रस्तुत खटल्यात महत्वाची बाब ही आहे की, विजय साक्षीदार क्र.५ याच्या पुराव्यानुसार आरोपीने मयताला ठोकर दिली परंतू, सदर ठिकाणी असणाऱ्या रस्त्यावरील नेमक्या कोणत्या ठिकाणी ठोकर झाली कि ज्यामुळे आरोपीचा निष्काळजीपणा हयगयी सिध्द होते अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही. अपघाताच्यावेळी आरोपी वेगाने वाहन चालवित होता असे सरकार पक्षाचे कथन असले तरी त्याबाबत सरकार पक्षाच्या साक्षीदाराने कोणतेही कथन केलेले नाही.

**१५.** दिपक (सा.क्र.२) याने त्याच्या पुराव्यात दिनांक ०९.०८.२०२२ रोजी गोटखिंडी रोडवर, स्मशानभुमीजवळ दुपारी १.३० च्या सुमारास अपघाताची घटना घडली व त्याला अतुल कांबळे याचा फोन आलेनंतर तो घटनास्थळी गेला व तेथे त्याला त्याचे वडील पडलेल दिसून आले या बाबी कथन केल्या आहेत. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले की, सदर गाडीचा क्र.एम.एच.१४–सी.यु.३६५० असा होता व ती गाडी युनिकॉर्न कंपनीची होती. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात पुढे असे कथन केले की, त्याचे नातेवाईकांनी त्याला ज्या गाडी चालकाने धडक दिली तो गाडीचालक दाखविला व त्याचे नाव अतुल शेजावळे असे होते. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपसात घटना त्याने प्रत्यक्ष पाहिले नसून घटनेबाबत त्याची माहिती ऐकीव माहिती आहे. तसेच तो घटनास्थळी गेला त्यावेळी तेथे बरीच लोक

जमले होते ही बाब कथन केली. सदर साक्षीदार हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. त्याने न्यायालयापुढे दिलेला पुरावा ऐकीव माहितीच्या आधारे दिलेला पुरावा आहे.

**१६.** तपासी अंमलदार (सा.क्र.६) यांनी त्याच्या पुराव्यात येडेनिपाणी ते गोटखिंड जाणाऱ्या रोडवर युनिकॉर्न मोटारसायकल क्र.एम.एच३६५० चा अपघात झाला होता व सदर ठिकाणी जावून त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा निशाणी २९ प्रमाणे केला होता. त्यांनी त्यांच्या पुराव्यात घटनास्थळाचा विस्तृत तपशील कथन केला आहे. सदरील साक्षीदाराने उलटतपासात अपघाताचे ठिकाण हे रस्त्याच्या एका बाजुला होते असे कथन केले असले तरी सदरचे ठिकाण कोणत्या बाजुला होते याबाबत स्पष्टता नाही. तपासी अंमलदार (सा.क्र.६) यांनी त्यांच्या पुराव्यात सदर गुन्ह्याचा तपास निशाणी ३० वरील आदेशानुसार त्यांच्याकडे हस्तांतरी झालेनंतर त्यांनी कागदपत्र हस्तगत केली व त्यानंतर साक्षीदारांचे जबाब् नोंदविले. मयताचे प्रमाणपत्र हस्तगत करुन आरोपी विरुध्द पुरेसा पुरावा मिळाल्याने दोषारोपपत्र दाखल केले. सदरील तपासी अंमलदार यांचा साक्षीपुरावा हा औपचारीक स्वरुपाचा आहे.

**१७.** प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीतर्फे वकीलांनी खालील न्यायनिर्णय दाखल केले आहे.

१) **मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठातील** ***विलास हणमंतराव कुलकर्णी वि. महाराष्ट्र राज्य, २०२५ ऑल एम.आर.(क्रि), ६०६*** *व* २) **मा.मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचा** ***महाराष्ट्र शासन वि. शेख जब्बारलाल मोहम्मद, २०२० ऑल एम.आर. (क्रि) १४५९:–***

सदर न्यायनिर्णयामध्ये अपघाताचे अचुक व नेमके घटनास्थळ (spot) व आरोपी कडून हयगयी व निष्काळजीपणे वाहन चालविले याबाबतचा ठोस व विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर नसल्यास, केवळ अपघात झाला म्हणून आरोपीविरुध्द दोषसिध्द करता येत नाही.

३) ***मा.सर्वोच्च न्यायालयातील, दिल्ली येथील महादेव हरी लोकरे वि.महाराष्ट्र राज्य, १९७२ क्रि.लॉ.जरनल,४९(व्ही. ७८ सी.१३), ए.आय.आर. १९७२ सुप्रिम कोर्ट २२१ :–***

भारतीय दंड संहिता कलम ३०४–अ अन्वये दोषसिध्दीसाठी आरोपीकडून झालेला हयगयी किंवा निष्काळजीपणाचे कृत्य मृत्युचे थेट व निकट कारण असल्याचे संशयाच्या पलीकडे सिध्द होणे आवश्यक असून केवळ अपघात किंवा निर्णयातील चुक पुरेशी ठरत नाही.

१८. सदर तीनही न्यायनिवाड्यांच्या बाबतीत आरोपीच्या सुविद्य वकीलांनी युक्तीवाद केला नाही. परंतू सदर न्यायनिर्णयावर ते भिस्त ठेवून आहेत. न्यायालयापुढे आलेल्या पुराव्याचे अवलोकन करता, उपरोक्त् विस्तृतपणे नमुद केलेल्या कारणमिमांसेनुसार प्रस्तुत घटनेत प्रभाकर हांडे यांचा दुर्दैवी मृत्यु झाला असला तरी सरकारपक्षाने प्रस्तुत घटनेत केवळ अपघात झाला ही बाब सिध्द करु शकला आहे परंतू सदर अपघाताकरीता आरोपीने त्याचे वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालविले तसेच घटनेचे नेमके व अचुक ठिकाण सिध्द करता आले नाही. त्यामुळे वर नमुद केलेले न्यायनिर्णय सदर खटल्यास लागू पडतात असे या न्यायालयाचे मत आहे.

४) ***मा.मुंबई उच्च न्यायालय, पणजी खंडपीठ यांचे रोसारिओ फर्नांनडीस वि. गोवा राज्य, २०१४ ऑल एम.आर. (क्रि) ६२७ :–***

प्रस्तुत घटनेत प्रत्यक्षदर्शी साक्षीदार विजय (स.सा.क्र.५) याचा जबाब घटनेनंतर त्वरीत नोंदविला गेला नाही व त्यामुळे त्याचा फायदा आरोपीला देणेत यावा असा युक्तीवाद केला. तसेच सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने आरोपीच्या सुविद्य वकीलांनी सदर न्यायनिर्णय दाखल केला आहे. परंतू सदरचे तत्व सदर न्यायनिर्णयात नमुद नाही तसेच त्याचा जबाब नोंदविण्यास विलंब झाला म्हणून त्याची साक्ष खोटी ठरत नाही. सदरील साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात त्याचे जवळच्या नातेवाईकांचा अपघात झाल्यामुळे घटनेच्या दिवशी व किंवा दुसऱ्या दिवशी त्याला पोलीसांना माहिती देण्यास जमले नाही ही बाब देखील कथन केली. प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने केवळ अपघाताची बाब त्वरीत कळविली नाही अथवा त्याचा जबाब पोलीसांकडून त्वरीत नोंदविला गेला नाही या कारणांवरुन त्याची साक्ष फेटाळता येणार नाही. त्यामुळे सदर न्यायनिर्णयाचा सविनय आदर राखुन या न्यायालयाचे असे मत आहे की, सदरचा न्यायनिर्णय प्रस्तुत खटल्यास सदर मुद्याकरीता लागू होत नाही. परंतू सदर

न्यायनिर्णयामध्ये भारतीय दंड संहिता कलम ३०४–अ मध्ये दोषसिध्दीसाठी आरोपीकडून हयगयी व निष्काळजीपणाची कृती ठोसपणे सिध्द झाली पाहिले व सदर कृती ही मृत्युचे थेट कारण असले पाहिजे हे तत्व देखील नमुद आहे. वर नमुद केलेल्या कारणमिमांसेनुसार या न्यायालयाचे सविनयपुर्वक असे मत आहे की, सदरच्या मुद्याकरीता सदर न्यायनिर्णय प्रस्तुत खटल्यास लागू होतो.

१९. फौजदारी खटल्यामध्ये सरकार पक्षाने आरोपीविरोधात दोषारोप संशयाच्या पलीकडे जावुन सिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच आरोपीच्या सहभागाबाबत संशय निर्माण झाल्यास त्याचा फायदा आरोपीला देण्यात यावा असे देखील संकेत आहे. सरकार पक्षाच्या खटल्यात कितीही सत्यता असली तरी देखील सरकार पक्षाला घटना सिद्ध करण्यासाठी आवश्यक असणारे टप्पे पार करावे लागतात व घटनांची साखळी देखील सिद्ध करावी लागते. जरी न्यायालयाची घटनेतील सत्यता अन्य असत्य गोष्टींपासुन बाजुला करण्याची जबाबदारी असली तरी देखील सदरील सत्य व असत्य घटना हया बाजुला करण्याइतपर्यंत परिस्थीती अभिलेखावरती असणे गरजेचे आहे. परंतु, प्रस्तुत खटल्यात सदरील बाब वर नमुद केलेल्या पुराव्याच्या आधारे करणे शक्य नाही. तपासलेल्या साक्षिदारांच्या पुराव्यावरुन आरोपी सदर घटनेकरिता जबाबदार होता हि बाब सिध्द होत नाही. उपल्ब्ध पुराव्यावरुन अपघातावेळी आरोपीने त्याचे वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालविले ही बाब सरकार पक्षाला सिद्ध करता आलेली नाही. म्हणुन आरोपी सदर प्रकरणातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.१ ते ३ साठीचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र.५ साठी.

२०. सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेली मोटर सायकल मुळ मालकास सुपुर्तनाम्याद्वारे परत देण्यात आलेली आहे. त्याबाबत अद्याप पर्यंत कोणीही आक्षेप नोंदवलेला नाही. त्यामुळे मुळ मालकास देण्यात आलेला मोटर सायकलचा अंतरिम ताबा हा अपिलाचा कालावधी

संपल्यानंतर कायम करण्यात येतो. मुद्दा क्र.१ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षाचा विचार करता आरोपी हा त्याच्या वरील आरोपा मधुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.५ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी अतुल शामराव शेजावळे फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम २७९, ३०४ (अ), ३३८ सह मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येऊन त्याने जातमुचलक्या बाबत जमा केलेली अनामत रक्कम त्यास योग्य त्या पुर्तते नंतर परत करण्यात यावी.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे अपिलाधीन न्यायालया समोर हजर राहण्याबाबत र.रु.१५०००/– (र.रु.पंधरा हजार मात्र) चा जामिन द्यावा जो आज पासुन पुढील सहा महिने अंमलात राहील.

JADHAV VIKRAM ABASAHEB
Digitally signed by JADHAV VIKRAM ABASAHEB
Date: 2026.02.11 11:19:54 +0530

**(व्ही.ए.जाधव)**

दिनांक – ११.०२.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर
ठिकाण – इस्लामपूर ता.वाळवा, जि.सांगली

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | 4th Jt. Civil Judge Jr. Division, Islampur. |
| Name of the Stenographer | :- | Abhijit R. Khatavkar |
| Date of pronouncement of Judgment on | :- | 11.02.2026 |
| Judgment signed by the P.O on | :- | 11.02.2026 |
| Judgment digitally signed on | :- | 11.02.2026 |
| Judgment uploaded on C.I.S. on | :- | 11.02.2026 |

************